| MHPU390004452012 | *नियमित दिवाणी दावा क्र. १९२/२०१२ मधील* |
|---|---|
| | **लता राहुल जाधव व इतर**<br>**वि.**<br>**दत्तु उर्फ दत्तोबा रामा जाधव व इतर** |

*निशाणी क्र. ८७ खालील आदेश*
(पारित दिनांक १२/०८/२०२६)

**१.** प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १२ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला 'विना जबाब' चा आदेश रद्दबातल होऊन मिळेणेकरीता दाखल केलेला आहे.

**२.** प्रस्तुत प्रतिवादी यांनी अर्जात असे कथन केले आहे की, सदरचा मुळ दावा हा पुणे येथील न्यायालयात स्पे. मु.न. २४९०/२०१० असा होता. त्यानंतर हा दावा या न्यायालयात वर्ग करण्यात आलेला आहे. वादीने दिनांक ०७/०३/२०२५ रोजी नि.क्र. ८४ नुसार तुर्तातूर्त मनाईचा अर्ज दिला होता. त्या अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले होते. दिनांक ०७/०४/२०२५ पासून ते दिनांक ०४/०८/२०२५ पर्यंत प्रतिवादींचे म्हणणे निशाणी क्र. ८४ चे अर्जास न आल्याने दिनांक ०४/०८/२०२५ रोजी प्रतिवादीविरुध्द विना जबाब चा आदेश पारित झालेला आहे. सदर अर्जावर या प्रतिवादीचे लेखी म्हणणे घेवून युक्तीवादाची सुनावणीची संधी मिळणे आवश्यक आहे. या प्रतिवादीचे नि.क्र. ८४ ला लेखी म्हणणे दाखल करुन न घेतल्यास वादी नि.क्र. ८४ वरील आदेशाचा गैरफायदा घेवून या प्रतिवादीला त्याच्या ताब्यात असणा–या ०० हे १० आर क्षेत्रातुन बेदखलही करण्याची शक्यता आहे. सबब, या प्रतिवादीविरुध्द दिनांक ०४/०८/२०२५ रोजी झालेला विना जबाब चा आदेश रद्द करुन या प्रतिवादीचे म्हणणे दाखल करुन घेणे आवश्यक आहे. सदरचा आदेश रद्द न झाल्यास प्रतिवादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. प्रतिवादीचे म्हणणे दाखल करुन घेतल्यास नैसर्गिक न्याय करणेही सोपे होईल, तसेच वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही.

**३.** वादी यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे देवून असे कथन केले आहे की, प्रतिवादीचा सदरचा अर्ज हा खोटा व लबाडीचा असून फेटाळण्यास पात्र आहे. प्रतिवादी हे

जाणीवपुर्वक दाव्याचे मिळकतीमध्ये बदल करु पाहत आहेत. सबब, वादी यांच्या वडीलोपार्जीत मिळकत असून वाटप नाही, सबब प्रतिवादी यांचा सदरचा अर्ज दंड करुन फेटाळण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. संपूर्ण कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादींविरुध्द वाटपासाठी व खरेदीखत रद्द करुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. जर 'विना जबाब' चा आदेश बाजूला सारुन प्रस्तुत प्रतिवादी यांचा मनाई अर्जावरील जबाब दाखल करुन घेतलेस याचा वादीवर कोणताही परिणाम होणार नाही. उलट त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादी यांना त्यांचा बचाव करणेची संधी मिळेल. तसेच प्रस्तुत दाव्याचा गुणदोषावर निकाल देणे न्यायालयास शक्य होईल. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादी विरुध्द पारीत झालेले झालेला 'विना जबाब चा आदेश रद्द करणे आवश्यक आहे. मी या ठिकाणी असे नमुद करु इच्छीतो की, प्रस्तुत प्रतिवादी प्रस्तुतचा अर्ज दि. १५/०७/२०२६ रोजी दिलेला आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांना 'विना जबाब' दाखल करण्यास काही विलंब झालेला आहे. त्याचप्रमाणे अर्जामध्ये नमुद कारणे विचारात घेता प्रतिवादी विरुध्द 'विना जबाब ' बाबत पारीत झालेला आदेश रद्द करणे आवश्यक आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज खर्चासहीत मंजूर करून प्रस्तुत प्रतिवादी यांना संधी देणे योग्य वाटते. सबब, खालील आदेश पारित करण्यात येत आहे. सबब, विवेचनास अधिन राहुन पुढील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी यांनी रक्कम रू.५००/– वादी यांना देण्याच्या अटीवर प्रस्तुत प्रतिवादी यांच्या विरुध्द पारीत झालेला 'विना जबाब ' आदेश रद्द करण्यात येतो.

SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
Digitally signed by SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
Date: 2026.08.12 17:18:57 +0530

दिनांक– १२/०८/२०२६
शिरुर.

**(संजय दि.वानखेडे)**
सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,
घोडनदी, शिरुर, जि.पुणे